# निशाणी क्र.४१ खालील आदेश

वादीने यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन असे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला आहे. वादीने दाव्यात नमुद केलेला पुर्व पश्चिम चालीचा १० फुट रुंदीचा अंदाजे २ ते २.५ किलोमिटर जुना तारापूर रस्ते पासून उजनी कॅनालपर्यंत असलेला सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता प्रवितादीने प्रतिदाव्यात त्यांचे स्वतःच्या खाजगी मालकीचा असल्याचे नमुद केले आहे. वास्तविक सदरचा रस्ता हा जुना पुर्वापार वहिवाटीचा असून सदर रस्त्यावरुन ४० ते ५० शेतकरी जाऊन येऊन वहिवाट करत असतात. प्रतिवादी हे सदरच्या रस्ता वहिवाटीस हरकत, अडथळा करत आहेत व तो रस्ता प्रतिवादी हे त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगत आहेत व तो रस्ता कायमचा बंद करण्याची धमकी प्रतिवादी देत आहेत. त्यामुळे दावा कलम मधील पान क्र.७ मध्ये अर्जात नमुद प्रमाणे मजकुर दुरुस्त करुन लिहिणे जरुरीचे व गरजेचे असल्याचे कथन वादीने केले आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रवितादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर दुरुस्तीस परवानगी न मिळाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, सदरची दुरुस्ती मंजुर होणे न्यायाच्या दृष्टीने जरुरीचे असल्याची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत अर्ज हा खरा नाही व तो त्यांना मान्य नाही. वादी कथन करतो त्या रस्त्याशी वादीचा काही संबंध नाही. वादी दाव्याचे माध्यमातून सबंध जोडू पाहत आहे व हक्क दाखवत आहे. वादी अगर इतर शेतकरी सदर रस्त्यावरुन जात–येत नाहीत. तो रस्ता प्रतिवादीचा स्वतंत्र रस्ता आहे. वादीच्या जमीनी तारापूर मुख्य रस्त्याच्यालगत आहेत त्यामुळे त्यांना रस्त्याची आवश्यकता नाही. सबब, वरील कारणास्तव प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुतचा

अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. वादी व प्रस्तावित प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०६. एकंदरीत वादीचा प्रस्तुतचा अर्ज पाहिला असता असे दिसते की, वादी हे स्थावर मिळकतीच्या अनुषंगाने दाव्यामध्ये काही मजकुर दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मागत आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दाव्यास प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला आहे व त्यामध्ये प्रतिवादी यांनी वादातील रस्ता त्यांचे स्वतःच्या खाजगी मालकीचा असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे वादीला प्रस्तुत अर्जाव्दारे दाव्यात अर्जात नमुदप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे. सदर कथनापुष्टयर्थ वादीने नि.४२ वर प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे.

०७. प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादीचा प्रस्तुतचा अर्ज हा कायदेशीर नसून सदर दुरुस्ती अर्जाच्या अनुषंगाने वादी हे सदर रस्त्यावर त्याचे मालकी हक्क व संबंध जोडत असल्याबाबतचे कथन केले आहे. परंतु, वादातील रस्ता हा कोणाच्या मालकीचा आहे व त्याचा वापर कोण करत आहे ही बाब संपुर्ण दाव्याचे कामी दोन्ही बाजुंनी सखोल पुरावा व कागदपत्रे दाखल केल्यानंतर विचारात घेता येणार आहे. त्यामुळे सदर बाब ही मुळ वादातील बाब आहे. अशा परिस्थितीत वादीस त्याची कथने मांडण्याची संधी देणे याठिकाणी आवश्यक ठरते.

०८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्याचे कामी पुरावा सुरु झाल्यानंतर वादी, प्रतिवादी यांना त्यांची कथने दुरुस्त करता येतात. प्रस्तुत कामी अद्याप वादीकडुन पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल झालेले नाही म्हणजेच अद्याप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे वादी मागणी करत असलेली नियोजित दुरुस्ती ही दाव्याचा गुणदोषांवर निकाल करण्यासाठी आवश्यक आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादींची कथने विचारात

घेता याबाबत पुर्णपणे उलटतपासाची व पुरावा देण्याची संधी प्रतिवादीस उपलब्ध असल्याने नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रस्तुतचा वादीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, एकंदरीत परीस्थितीचा विचार करता न्यायालयीन गुंतागुंतीची प्रक्रिया टाळण्यासाठी वादीला अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज **(नि.४१)** खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीला असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मागणी प्रमाणेची दुरुस्ती पुढील तारखेस करुन आवश्यक तेवढया दुरुस्त दाव्याच्या प्रती ताबडतोब याकामी दाखल कराव्यात.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2025.07.09 11:20:31 +0530

दिनांकः– ०८.०७.२०२५.

(श्रीमती पी.एस.गोवेकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : A. S. Bakale |
| Court | : Civil Judge J. D., Mohol. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 08.07.2025 |
| Judgment / Order uploaded on | : 09.07.2025 |